ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
नांदेड वार्ता
www.nandedwarta.com
•वर्ष २४ वे • अंक २९२ • बुधवार दि.१९ ऑगस्ट २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

# शिवसेना नाव-चिन्ह गोठवा ;ठाकरे सेनेकडून जोरदार युक्तिवाद

**नवी दिल्ली:शिवसेना पक्ष आणि चिन्ह आम्हाला देता येत नसेल तर ते गोठवावे अशी मागणी शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाच्यावतीने ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल आणि देवदत्त कामत यांनी याप्रकरणी आज सर्वोच्च न्यायालयातील युक्तीवादात केली.**

## अध्यक्षांचा निर्णय न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या कक्षेत

शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाच्या वादावर सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीत ठाकरे गटाचे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल आणि देवदत्त कामत यांनी विधानसभा अध्यक्ष व निवडणूक आयोगाच्या निर्णयांना जोरदार आव्हान दिले. विधिमंडळातील फूट म्हणजेच मूळ राजकीय पक्षातील फूट नव्हे आणि केवळ आमदारांचे बहुमत मिळाल्याने एखादा गट मूळ राजकीय पक्ष ठरत नाही, हा सिब्बल यांच्या युक्तिवादाचा गाभा होता. तर अध्यक्षांचा निर्णय कायद्याच्या चौकटीबाहेरचा ठरल्यास सर्वोच्च न्यायालय न्यायालयीन पुनर्विलोकनातून त्यात हस्तक्षेप करू शकते, असा मुद्दा देवदत्त कामत यांनी मांडला.

विधानसभा अध्यक्षांनी शिवसेनेतील विधिमंडळातील फूट हीच राजकीय पक्षातील फूट मानून एकनाथ शिंदे यांच्या गटाला शिवसेना म्हणून मान्यता दिली. हा निष्कर्ष दहाव्या अनुसूचीच्या उद्देशाशी विसंगत असून अध्यक्षांनी आपल्या अधिकारक्षेत्राबाहेरील बाबीवर निर्णय दिल्याचा दावा कामत यांनी केला. अध्यक्षांचा निर्णय चुकीचा किंवा कायद्याच्या विरोधात असल्याचे न्यायालयाने ठरविल्यास तो रद्द करण्याचा अधिकार न्यायालयाला आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. सुनावणीदरम्यान कार्यकाळ संपलेल्या आमदारांना आता अपात्र ठरवता येईल का, असा प्रश्न न्यायालयाने केला असता, न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या आधारे आवश्यक निर्णय घेता येऊ शकतो, असे कामत यांनी सांगितले.कामत यांनी आपल्या युक्तिवादात अध्यक्षांच्या निर्णयाचा थेट घटनात्मक परिणाम अधोरेखित केला. कपिल सिब्बल यांनी राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्षातील मूलभूत फरक स्पष्ट केला.



विधिमंडळ पक्षाचा कालावधी विधानसभा कार्यकाळापुरता मर्यादित असतो, तर राजकीय पक्ष ही कायमस्वरूपी संघटना असते. त्यामुळे विधिमंडळातील संख्याबळाच्या आधारे राजकीय पक्षाची ओळख बदलता येणार नाही. शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्ह ठाकरे गटालाच मिळावे; ते शक्य नसेल तर पक्षाचे नाव आणि चिन्ह गोठवावे, अशी पर्यायी मागणी त्यांनी केली. त्यांना मिळत नसेल आणि आम्हालाही मिळत नसेल तर चिन्ह गोठवावे, हा सिब्बल यांचा महत्त्वाचा पर्यायी युक्तिवाद ठरला.

ठाकरे गटाने २१ जूनच्या घटनाक्रमालाही महत्त्व दिले. उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांना पक्षनेतेपदावरून हटवून अजय चौधरी यांची त्या पदावर नियुक्ती केली होती. या निर्णयावर उद्धव ठाकरे यांची स्वाक्षरी असतानाही विधानसभा अध्यक्षांनी शिंदे यांनाच पक्षाचा नेता कशाच्या आधारे मानले, असा सवाल सिब्बल यांनी केला. अधिकृत नेतृत्वाचा निर्णय ठाकरे यांच्या बाजूने असताना शिंदे गटाचा व्हिप वैध कसा ठरवला, यावरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले.केवळ विधिमंडळातील आमदारांची संख्या जास्त असल्यामुळे एखादा गटच मूळ राजकीय पक्ष ठरत नाही, हा सिब्बल यांच्या युक्तिवादाचा केंद्रबिंदू होता. प्रत्येक गटाने स्वतंत्र नेता आणि स्वतंत्र व्हिप मानण्यास सुरुवात केली, तर दहाव्या अनुसूचीचा उद्देशच निष्फळ ठरेल, असा इशारा त्यांनी दिला. फुटण्यापूर्वी या पक्षघटनेवर उद्धव ठाकरे किंवा एकनाथ शिंदे यांनी आक्षेप घेतला नव्हता. उलट, शिंदे गटातील ३९ आमदारांनी विधानसभा अध्यक्षांसमोर दाखल केलेल्या स्वतंत्र पान ४ वर

## राहुल गांधींच्या पुण्यातील कार्यक्रमाला अखेर परवानगी

पुणे:काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या उपस्थितीत येत्या २२ ऑगस्ट रोजी पुण्यात आयोजित करण्यात आलेल्या छात्रो की गुंज या कार्यक्रमाला अखेर पुणे पोलिसांनी कायदेशीर परवानगी दिली आहे. काही अटी व शर्तीसह ही परवानगी देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून कार्यक्रमाच्या परवानगीवरून सुरू असलेल्या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे.

या कार्यक्रमासाठी पोलिसांकडून अद्याप परवानगी मिळाली नसतानाही कार्यक्रम कोणत्याही परिस्थितीत होणारच, अशी भूमिका काँग्रेसचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी घेतली होती. बुधवारी प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी पोलिसांच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली होती. त्यांच्या या भूमिकेमुळे कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर पुण्यातील काँग्रेस कार्यकर्ते आक्रमक होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. अखेर पोलिसांनी कार्यक्रमाला परवानगी दिल्याने संभाव्य संघर्ष टळला आहे.

## अंध विद्यार्थिनीच्या मृत्यूने खळबळ;सीजेपी प्रमुख अभिजीत दिपके देगलूरला भेट देणार

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर येथील निवासी दिव्यांग विद्यालयातील अल्पवयीन अंध विद्यार्थिनीचा उपचारादरम्यान संशयास्पद मृत्यू प्रकरणाची गंभीर दखल घेत कॉक्रोच जनता पार्टीचे (सीजेपी) प्रमुख अभिजीत दिपके हे लवकरच देगलूर येथे येऊन अंधशाळेला भेट देणार असल्याचे एका मुलाखतीदरम्यान त्यांनी जाहीर केले आहे.

देगलूरच्या निवासी दिव्यांग विद्यालयातील अल्पवयीन दिव्यांग विद्यार्थिनीचा उपचारादरम्यान संशयास्पद मृत्यू झाल्याने देगलूर परिसरात खळबळ उडाली आहे. विद्यार्थिनीच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून वसतिगृहातील कर्मचारी, मुख्याध्यापक, संस्थाचालक व इतर कर्मचाऱ्यांविरुद्ध देगलूर पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३८६/२०२६ दाखल करण्यात आला. पीडित विद्यार्थिनी दोन्ही डोळ्यांनी अंध असून ती देगलूर येथील निवासी दिव्यांग विद्यालयाच्या वसतिगृहात इयत्ता दहावीमध्ये शिक्षण घेत होती. तिच्या वडिलांनी देगलूर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, वसतिगृहातील विधीसंघर्षग्रस्त बालक तिच्याशी अश्लील चाळे करीत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. दिव्यांग विद्यार्थिनीची देखभाल, सुरक्षितता आणि आरोग्याची जबाबदारी विद्यालय प्रशासनाची असतानाही तिची प्रकृती बिघडल्यानंतर तिला वेळेवर उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले नाही, तसेच नातेवाईकांनाही याची माहिती देण्यात आली नाही, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.मुलीवर लातूर येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असताना १६ ऑगस्ट रोजी तिचा मृत्यू झाला. त्यानंतर १७ ऑगस्ट रोजी तिच्या वडिलांनी देगलूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिस नोंदीनुसार, या कारणामुळे गुन्हा दाखल करण्यास विलंब झाला.

या प्रकरणी वसतिगृहातील विधीसंघर्षग्रस्त बालक, मुख्याध्यापक मारोती शिंदे, संस्थाचालक, शाळेतील कर्मचारी अशोक काळे, कमलबाई रामचंद्र कांबळे तसेच इतर कर्मचाऱ्यांविरुद्ध तक्रारीत आरोप करण्यात आले आहेत. विद्यार्थिनीच्या देखभालीत हयगय, निष्काळजीपणा आणि कर्तव्यात कसूर केल्याचा आरोप करण्यात आला आहे. सीजेपीकडून सध्या देशातील शाळांमधील विद्यार्थ्यांच्या मूलभूत सुविधा आणि सुरक्षिततेच्या प्रश्नावरही आंदोलन करण्याची भूमिका घेण्यात आली आहे. याच पार्श्वभूमीवर देगलूर येथील अंध विद्यार्थिनीच्या संशयास्पद मृत्यूबाबत अभिजीत दिपके यांना विचारणा करण्यात आली असता, त्यांनी या प्रकरणाची माहिती घेऊन लवकरच देगलूरला भेट देणार असल्याचे स्पष्ट केले.

दिपके यांच्या संभाव्य भेटीमुळे या प्रकरणाकडे राज्याचे आणि प्रशासनाचे लक्ष वेधले जाण्याची शक्यता आहे. पीडित विद्यार्थिनीच्या मृत्यूमागील नेमके कारण, तिच्या सुरक्षिततेत झालेली कथित हयगय आणि संबंधितांची जबाबदारी याबाबत सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता पुढे येत आहे. पोलिस तपासातून या प्रकरणातील सत्य समोर येण्याची प्रतीक्षा आहे.

## विधिमंडळ अनुसुचित जमाती कल्याण समितीकडून विविध विभागांचा आढावा

नांदेड/प्रतिनिधी-विधिमंडळ अनुसुचित जमाती कल्याण समितीचे अध्यक्ष आ.दौलत दरोडा यांच्या नेतृत्वाखाली समिती सदस्यांचा आजपासून तीन दिवशीय नांदेड दौऱ्याला प्रारंभ झाला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनाच्या सभागृहात समितीने विविध विभागाचा आढावा घेतला.

विधिमंडळ अनुसुचित जमाती कल्याण समितीच्या नांदेड दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून तयारी पूर्ण करण्यात आली आहे. समितीचे अध्यक्ष आ.दौलत दरोडा यांच्या नेतृत्वाखाली समितीचे नऊ सदस्य नांदेड शहरात दाखल झाले. आज (बुधवार) सकाळपासूनच नियोजन भवनाच्या सभागृहात आढावा बैठकीला प्रारंभ झाला. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जि.प.चे सीईओ महेश पाटील, महापालिका आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे, पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. आ.दौलत दरोडा व सदस्यांनी जिल्हा परिषद, पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, राज्य परिवहन महामंडळ व इतर विभागांचा बैठकीत आढावा घेतला. समितीने दिवसभर बैठकांचे सत्र सुरुच ठेवले होते. गुरुवारी बैठकीनंतर समितीचे सदस्य हे जिल्ह्यात विविध ठिकाणी पाहणीसाठी रवाना होणार आहेत.

## मराठवाड्यात आज वादळी पावसाचा इशारा; सहा जिल्ह्यांना यलो अलर्ट

नांदेड/प्रतिनिधी-ऑगस्ट महिन्यात पावसाची तीव्रता कमी होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली असली, तरी राज्याच्या काही भागांत अधूनमधून पावसाच्या सरी सुरूच आहेत. आज मराठवाड्यातील बीड, जालना, धाराशिव आणि लातूर या जिल्ह्यांसह मध्य महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर हवामान विभागाने संबंधित जिल्ह्यांना यलो अलर्ट दिला आहे. विदर्भातील गोंदिया जिल्ह्यातही जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

मान्सूनचा आस असलेला कमी दाबाचा पट्टा पंजाबमधील फिरोजपूरपासून डेहराडून, शाहजहानपूर, वाराणसी आणि देहरीमार्गे बंगालच्या उपसागरापर्यंत सक्रिय आहे. पूर्व उत्तर प्रदेश परिसरात चक्राकार वाऱ्यांची स्थिती निर्माण झाली असून, तेथून गुजरातपर्यंत कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. या हवामान प्रणालीचा परिणाम मराठवाड्यासह राज्यातील काही भागांवर होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.बीड, जालना, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यांत काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस होण्याचा अंदाज आहे. मध्य महाराष्ट्रातील सोलापूर तसेच विदर्भातील गोंदिया जिल्ह्यातही जोरदार सरींची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी तसेच शेतकऱ्यांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. राज्याच्या अन्य काही भागांत तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता कायम आहे.दरम्यान, ओडिशा आणि पश्चिम बंगालच्या किनारपट्टीलगत निर्माण झालेले तीव्र कमी दाबाचे क्षेत्र जमिनीवर आले आहे. सध्या झारखंड आणि पश्चिम बंगालमध्ये ही हवामान प्रणाली सक्रिय असून, ती ताशी सुमारे १० किलोमीटर वेगाने वायव्य दिशेने सरकत आहे. या प्रणालीचे केंद्र झारखंडमधील हजारीबाग पासून सुमारे ५० किलोमीटर पूर्वेला, रांचीपासून ८० किलोमीटर ईशान्येला आणि बिहारमधील गयापासून सुमारे १३० किलोमीटर आग्नेयेला होते.आज, १९ ऑगस्ट रोजी या कमी दाबाच्या प्रणालीची तीव्रता कमी होण्याची शक्यता आहे. मात्र, त्याचा प्रभाव आणि राज्यातील विविध भागांतील स्थानिक हवामान परिस्थिती लक्षात घेता काही ठिकाणी पावसाचा जोर वाढण्याची शक्यता कायम आहे. त्यामुळे यलो अलर्ट देण्यात आलेल्या जिल्ह्यांतील नागरिकांनी वीजांच्या कडकडाटादरम्यान मोकळ्या मैदानात जाणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कुंटुरकरांचा वाढदिवस जोरदार;ओबीसी समाजाला दिलेला शब्द पाळणार का?

नायगाव/प्रतिनिधी-राजेश गंगाधरराव कुंटुरकर यांच्या वाढदिवसानिमित्त कुंटूर परिसरात समर्थकांकडून जोरदार उत्साह व्यक्त करण्यात आला. वाढदिवसाचा जल्लोष सुरू असतानाच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ओबीसी आरक्षित जागेवर कुंटुरकर कुटुंबाची भूमिका काय राहणार? हा प्रश्न कुंटूर सर्कलमध्ये पुन्हा चर्चेत आला आहे.

माजी मंत्री कै.गंगाधरराव कुंटुरकर यांच्या राजकीय वारशामुळे कुंटुरकर कुटुंबाचा या भागातील राजकारणावर दीर्घकाळ प्रभाव राहिला आहे. राजेश कुंटुरकर यांनीही हा राजकीय वारसा पुढे नेत स्थानिक राजकारणात आपले स्थान निर्माण केले. मागील ओबीसी आरक्षणाच्या निवडणुकीच्या काळात सर्वसाधारणमध्येही तुम्हीच आणि ओबीसी मध्येही तुम्हीच? असा सवाल ओबीसी समाजातील काही घटकांकडून उपस्थित करण्यात आला होता. आरक्षित जागांवर स्थानिक ओबीसी नेतृत्वाला संधी मिळावी, अशी मागणीही त्यावेळी करण्यात आली होती.



याच पार्श्वभूमीवर राजेश कुंटुरकर यांनी यापुढे माझ्या कुटुंबातील एकही व्यक्ती ओबीसी आरक्षित जागेवर निवडणूक लढवणार नाही, असा शब्द दिल्याचे त्या वेळी उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे आता आगामी निवडणुकीत हा शब्द पाळला जाणार का, याकडे ओबीसी समाजाचे लक्ष लागले आहे. कुंटूर जिल्हा परिषद सर्कलमध्ये राजेश कुंटुरकर यांना मानणारा मोठा वर्ग असल्याने त्यांच्या निर्णयाचा स्थानिक राजकारणावर परिणाम होण्याची शक्यता आहे. दिलेला शब्द पाळल्यास ओबीसी समाजातील विश्वास अधिक दृढ होईल. मात्र भूमिका बदलल्यास राजकीय नाराजी वाढण्याची शक्यता असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. दरम्यान, आरक्षित जागांवर स्थानिक ओबीसी समाजातील इच्छुकांना संधी मिळावी, अशी भूमिका घेणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये या विषयावर चर्चा सुरू आहे. तसेच दीर्घकाळ एकाच राजकीय कुटुंबाला संधी मिळत असल्याच्या भावनेतून काही इतर समाजातील इच्छुकांमध्येही नाराजी असल्याची चर्चा आहे. राजेश कुंटुरकर यांनी ओबीसी समाजाला दिलेला शब्द आगामी निवडणुकीत पाळला जाणार का, की राजकीय समीकरणांनुसार भूमिका बदलणार? याचे उत्तर आगामी काळात स्पष्ट होणार आहे.या संदर्भात राजेश कुंटुरकर यांची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

## परीक्षांसाठी सक्षम चौकटीची गरज-सुप्रिम कोर्ट

### नीटची यंत्रणा फुलप्रूफ असल्याचा केंद्राचा दावा

नवी दिल्ली:नीट-यूजीची सध्याची परीक्षा यंत्रणा फुलप्रूफ असून ती भेदणे कठीण असल्याचा दावा केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात केला. मात्र, केवळ सुरक्षा उपाय करून भागणार नाही; परीक्षा व्यवस्थेसाठी कायमस्वरूपी आणि सक्षम संस्थात्मक चौकट उभारणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायमूर्ती पी.एस. नरसिम्हा आणि न्यायमूर्ती आलोक अराधे यांच्या खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीदरम्यान केंद्राने प्रश्नपत्रिका सुरक्षेची माहिती दिली. अनेक प्रश्ननिर्मात्यांकडून प्रश्नांची बँक तयार करून घेतली जाते. अंतिम प्रश्नपत्रिकेत कोणते प्रश्न असतील, याची माहिती त्यांना नसते, असे केंद्राने सांगितले.सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितले की, सुमारे ५०० प्रश्नांच्या प्रश्नबँकेतून चार प्रश्नपत्रिका तयार केल्या जातात. त्यापैकी दोन प्रश्नपत्रिका निवडल्या जातात. छपाई सीसीटीव्हीच्या देखरेखीखाली आणि केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या सुरक्षेत होते. प्रश्नपत्रिका वाहून नेणाऱ्या वाहनांना जीपीएसद्वारे ट्रॅक केले जाते.परीक्षेपूर्वी प्रश्नपत्रिकांचे दोन संच सुरक्षित स्ट्रॉंग रूममध्ये ठेवले जातात. परीक्षेच्या दिवशी कोणता संच वापरायचा, याचा निर्णय एनटीएचे महासंचालक घेतात. प्रश्नपत्रिकांच्या वाहतुकीपासून परीक्षा केंद्रापर्यंत प्रत्येक टप्प्यावर देखरेख आणि सुरक्षा प्रोटोकॉल कडक करण्यात आल्याचे केंद्राने सांगितले.दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने परीक्षा व्यवस्थेच्या व्यापक स्वरूपावर प्रश्न उपस्थित केले. सुरक्षित कार्यालये, सायबर सुरक्षा, गोपनीय पायाभूत सुविधा, स्वतंत्र माहितीभांडार आणि माहिती साठवणुकीबाबत न्यायालयाने माहिती मागितली.

# धर्मस्वातंत्र्याचा कायदा की,धर्मांतरावर अंकुश?

**धर्मस्वातंत्र्य कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने २८ ऑगस्टचा मुहूर्त निवडला आहे. कोणताही कायदा हा केवळ शासनाच्या अधिकाराचे प्रदर्शन करण्यासाठी नव्हे, तर नागरिकांचे जीवन अधिक सुरक्षित, सुसह्य आणि शिस्तबद्ध करण्यासाठी निर्माण केला जातो. देशातील प्रत्येक नागरिकाला कायद्याच्या चौकटीत आपले जीवन जगता यावे, त्याच्या स्वातंत्र्यावर अनावश्यक बंधने येऊ नयेत आणि समाजात शांतता व सुव्यवस्था नांदावी, हा कायद्यामागचा मूलभूत उद्देश असतो. त्यामुळे धर्मस्वातंत्र्य कायदाही याच व्यापक उद्देशाने तयार करण्यात आला असेल, तर त्याचे स्वागतच झाले पाहिजे. मात्र या कायद्याच्या स्वरूपाबाबत आणि भविष्यातील वापराबाबत समाजातील एका मोठ्या वर्गाच्या मनात शंका निर्माण झाल्या असतील तर त्या शंकांचे निरसन करण्याची जबाबदारी शासनकर्त्यांची आहे. जबरदस्ती, फसवणूक किंवा आमिष दाखवून कोणाचेही धर्मांतर होता कामा नये, याबाबत दुमत असण्याचे कारण नाही. एखाद्या व्यक्तीच्या श्रद्धेचा गैरफायदा घेऊन तिच्यावर धर्म बदलण्यासाठी दबाव आणला जात असेल तर त्याविरोधात कठोर कायदेशीर कारवाई झालीच पाहिजे. परंतु त्याच वेळी भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला आपल्या श्रद्धेनुसार धर्म मानण्याचे, आचरण करण्याचे आणि त्याचा प्रसार करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. त्यामुळे धर्मांतराला आळा घालण्याच्या नावाखाली एखाद्या व्यक्तीच्या घटनात्मक स्वातंत्र्यावर गदा येणार नाही, याची खबरदारी घेणे तितकेच आवश्यक आहे. मुळात या कायद्याच्या नावातच 'धर्मस्वातंत्र्य' आहे; मात्र त्याचा मुख्य वापर धर्मांतराच्या विरोधात होणार असेल तर या विरोधाभासावर चर्चा होणे स्वाभाविक आहे. धर्माचे स्वातंत्र्य म्हणजे केवळ आपल्या धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य नव्हे, तर व्यक्तीला स्वतःच्या श्रद्धेविषयी निर्णय घेण्याचे स्वातंत्र्यही त्यात अभिप्रेत आहे. त्यामुळे स्वेच्छेने धर्म बदलणाऱ्या व्यक्ती आणि दबाव, फसवणूक अथवा प्रलोभनामुळे धर्म बदलणाऱ्या व्यक्ती यांच्यातील फरक कायद्यात स्पष्ट असणे अत्यंत आवश्यक आहे.जग झपाट्याने बदलत आहे. जागतिकीकरणामुळे विविध धर्म, जाती, भाषा आणि संस्कृतीतील लोक एकमेकांच्या अधिक जवळ आले आहेत. शिक्षणाचा प्रसार झाला की जातिभेद, धर्मभेद आणि सामाजिक पूर्वग्रह कमी होतील, असा अंदाज अनेक वर्षांपासून व्यक्त केला जात होता. परंतु आजची परिस्थिती पाहता चित्र फारसे आशादायक दिसत नाही. उच्चशिक्षित समाजातही जात आणि धर्माच्या भिंती अनेक ठिकाणी अधिक मजबूत होताना दिसतात. सोशल मीडियापासून राजकारणापर्यंत धार्मिक आणि जातीय अस्मितांना सातत्याने खतपाणी मिळत आहे. अशा परिस्थितीत धर्मस्वातंत्र्य कायद्याची अंमलबजावणी अत्यंत संवेदनशीलपणे होणे गरजेचे आहे. कायद्याचा गैरवापर होण्याची शक्यता हा या चर्चेतील सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. एखाद्या प्रौढ व्यक्तीने स्वतःच्या इच्छेने घेतलेल्या निर्णयाकडेही संशयाच्या नजरेने पाहिले गेले, तर कायद्याचा मूळ उद्देशच धोक्यात येऊ शकतो. दोन व्यक्तींमधील वैयक्तिक संबंधांना धार्मिक रंग देऊन तक्रारी दाखल झाल्या किंवा सामाजिक दबावातून एखाद्यावर कारवाई झाली, तर कायदा संरक्षण देण्याऐवजी भय निर्माण करणारे साधन ठरू शकतो. म्हणूनच कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेलाही स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे आणि योग्य प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.शासनाने या कायद्याबाबत समाजातील शंका दूर करण्यासाठी खुली चर्चा घडवून आणली पाहिजे. कायद्यात नेमक्या कोणत्या कृती गुन्हा ठरतील, स्वेच्छेने धर्म स्वीकारणाऱ्या व्यक्तीचे अधिकार कोणते असतील, तक्रारींची चौकशी कशी होईल आणि खोट्या तक्रारींपासून नागरिकांचे संरक्षण कसे केले जाईल, याबाबत स्पष्टता असली पाहिजे. २८ ऑगस्टपासून कायदा लागू होईल; पण त्याची खरी परीक्षा त्याच्या अंमलबजावणीत होणार आहे. धर्माचे संरक्षण करताना नागरिकांचे स्वातंत्र्य अबाधित राहिले पाहिजे आणि नागरिकांच्या स्वातंत्र्याचे रक्षण करताना जबरदस्तीच्या धर्मांतराला कोणतेही संरक्षण मिळता कामा नये. या दोन्ही टोकांमध्ये संतुलन साधणे हेच शासनाचे खरे कौशल्य आहे. धर्मस्वातंत्र्याचा कायदा नागरिकांच्या स्वातंत्र्याचा रक्षक ठरावा; संशय, भीती आणि सामाजिक दडपणाचे हत्यार नव्हे. शासनाने या कायद्याविषयीच्या सर्व शंकांचे निरसन करून त्याची अंमलबजावणी पारदर्शक, निष्पक्ष आणि घटनात्मक मूल्यांशी सुसंगत पद्धतीने करावी, एवढीच अपेक्षा.**

# श्रावण महाराष्ट्राचा ;पाळला तर चांगभलं



श्रावण महिना...या महिन्याची ओळख सणांचा महिना म्हणून आहे. कारण या महिन्यात भरपूर सणं असतात. या महिन्यात सापाला जास्त महत्व दिलं जातं. त्याची पुजा केली जाते. त्यासाठी यात्रा केली जाते. ते या महिन्यात जास्त निघतात. कारण त्यांच्या अधिवासाचे ठिकाण या महिन्यात येणाऱ्या पावसानं भरलेले असतात. मग ते वर जमीनीवर येवून कुठंही अधिवास करीत असतात. ज्यातून वर्तमानपत्रातून आलेल्या बातमीनुसार याच सापानं सहा मुलींना दंश केला व त्यातील तीन मुली मरण पावल्या. साप चावू नये वा त्याचा दंश होवू नये म्हणून श्रावण महिना व्यवस्थित पाळला जातो. त्या निमित्यानं यात्रा वैगेरे केल्या जातात. घरी श्रीकृष्णाच्या मातीच्याही मुर्तीचं पुजन केलं जातं. तरीही एखाद्या वेळेस गालबोट लागतंच व श्रावण बदनाम होत असतो. तसं पाहिल्यास श्रावण महिन्याचे जसे तोटे आहेत. तसाच तो पाळण्याचे अनेक फायदेही आहेतच.

श्रावण महिना दोन पद्धतीनं सुरु होतो. पहिली पद्धत आहे, पौर्णिमेपासून सुरुवात होणे. जसे उत्तरप्रदेश, बिहार, दिल्ली, छत्तीसगड अशा काही राज्यातील लोकँश्रावण महिन्याची सुरुवात ही पौर्णिमेपासून करतात. याचाच अर्थ महाराष्ट्र प्रदेशात राहणाऱ्या हिंदी भाषिक लोकांच्या श्रावणाची सुरुवात ही पंधरा दिवस आधीच म्हणजे पौर्णिमेपासून होते व तो महिना रक्षाबंधनच्या दिवशी असलेल्या पौर्णिमेला समाप्त होतो. तसं महाराष्ट्रात नाही. महाराष्ट्रात या महिन्याची सुरुवात दिपपुजेपासून होते. तसाच या महिन्याचा शेवट पोळ्याच्या दिवशी होतो. याचं कारण महाराष्ट्रात पंचाक नावाचं पंचांग मानलं जातं. श्रावण मासात दिपपुजेनंतर नागपंचमी, गोकुळाष्टमी, रक्षाबंधन व पोळा हे सणं येतात. आपण फक्त महाराष्ट्रात श्रावण महिन्यात येणाऱ्या सणांची माहिती पाहूया.श्रावण मासात पहिला सण येतो जीवती. दिपपुजा वा जीवती. हा सण आला वेद व्यासांपासून. वेद व्यास हे केवळ एक ऋषीच नव्हते तर ते गुरुही होते. त्यांना असलेलं ज्ञान ते इतरांना निःस्वार्थपणे शिकवीत असत. त्यांच्याच हाताखाली महाभारत कालीन संजय, ज्याला पहिला पत्रकार म्हणतो, तो शिकला. त्यांनीच आषाढी पौर्णीमेला गुरुचं पुजन करावं लागतं याची सुरुवात केली.

तो काळ...त्या काळात काही काही शिष्यांना ज्ञान हवं असायचं. तेव्हा ते शिष्य कोणत्याही गुरुजवळ केव्हाही जात व त्या गुरुंना गुरु बनवून त्यांच्याकडून केव्हाही ज्ञान प्राप्त करुन घेत. परंतु वेद व्यासांनी त्याचा विचार केला व शिक्षणात सुत्रबद्धता आणली. कोणत्याही शिष्याला जर ज्ञान मिळवायचं असेल तर त्यानं आषाढी पौर्णीमेला गुरुजवळ यायचं. त्या गुरुचं पुजन करायचं. त्यांचा यथोचीत सन्मान करायचा व त्यांची यथोचीत सेवा करायची. त्यांच्या पुर्वचाचणीत पास व्हायचं. मग गुरु ठरवेल की त्याला शिक्षण द्यायचं की नाही. या प्रक्रियेला पंधरा दिवसाचा अवधी म्हणजे आषाढ पौर्णीमा ते जिवती पुढेपर्यंत वेळ लागायचा. त्यातच असा शिष्य त्या गुरुंच्या परीक्षेत पास झाला की श्रावण महिण्याच्या पहिल्या दिवसापासून त्या शिष्यांच्या शिक्षणाची सुरुवात करायची, अर्थातच दिपपुजन करायचं. दिपपुजन यासाठी की त्या गुरुनं जे ज्ञान मिळवलं आहे. ते ज्ञान त्या शिष्यानं प्राप्त करावे व ते ज्ञान त्या शिष्यानं पुढं जावून गुरु बनून आपल्या शिष्यांना द्यायचे. तसं पाहता ते कार्य आपला शिष्य विसरु नये यासाठी असा गुरु एक तेलाचा दिवा लावायचे व ते आपल्या शिष्याच्या हाती देवून ठामपणे व स्पष्टपणे सांगायचे की हा तुझ्या हातातील दिवा सतत तेवत ठेवायचा. जसा विवाह सोहळ्यात वधूकडील लोकँ वराकडील लोकांच्या हातात दिवा देतात तसं. त्याचा अर्थ वंश वाढो असा व या दिपपुजेचा अर्थ ज्ञानाचं वृद्धींकरण व्हावं असा आहे. ते बोलणं लक्षात घेत तो शिष्य या दिपपुजेच्या दिवसापासून आयुष्यभर त्या दिव्याला जपत राहायचा. तसाच तो दिवा तेवत ठेवत असे. पुढे यात अध्यात्मपणा आला व त्याला अंधश्रद्धेचं स्वरुप प्राप्त झालं व दिपपुजन ही प्रथा पडली.

दिपपुजेनंतर दुसरा श्रावण मासातील सण येतो नागपंचमी. त्यात मुख्यत्वे शेतकऱ्यांचे दैवत असलेल्या नागाला जास्त मानलं जातं. ही पद्धत संपूर्ण महाराष्ट्रात सुरु असते. विदर्भातील नागपंचमी उत्सवाचं वर्णन केल्यास विदर्भातील लोकँ नागपंचमीला नागद्वारच्या यात्रेला जातात. जी यात्रा अतिशय कठीण असून जीव घेणारी आहे. या यात्रेत एवढे भावीक आपल्या जीवावर उदार होवून येतात की त्याची कल्पना करता येत नाही. जणू या यात्रेतील भावीक पाहिले की कल्पना येते भाविकांच्या भक्तीभावपणाचा. या यात्रेत हवशे, नवशे व गवशेही असतात. त्यातील बरेचजण दारुही पितात. परंतु या टेकडीचा मालक असलेला स्वामी नागराज त्यांनाही काहीच होवू देत नाही. तसं पाहिल्यास या ठिकाणी चालणं म्हणजे तारेवरची कसरत आहे. असे बरेचसे भावीक असतात की जे या ठिकाणच्या गोटाळ भागात पायात चप्पल न वापरता चालतात. तसं त्यामागं एक शास्त्रीय कारणही आहे. आपल्या पायात जे दाबबिंदू असतात, ते दाबबिदूं आपल्या पायी चालण्यानं खडे, गोटे रुतून सक्रिय होतात. ज्यातून आपल्या जुन्यातील जुन्या व्याधीतही सुधारणा होत असते. तसंच आपल्या शरीराच्या रक्तवाहिन्यात जो कोलेस्टेरॉल गोळा होतो. त्या कोलेस्टेरॉलनं आपल्या रक्तवाहिन्या जाम झालेल्या असतात. त्या रक्तवाहिन्या या ठिकाणी अनवाणी चालण्यानं नव्हे तर केवळ चालण्यानं खुल्या होतात. एकँद्दरीत सांगायचं झाल्यास जशा गडरच्या नाल्या पावसाचं सांडपाणी व्यवस्थीत वाहून जावं म्हणून आपण रस्त्यावरच्या नाल्या साफ करीत असतो. तसंच शरीरातील रक्त व्यवस्थित वाहावं वा त्या रक्ताला रक्तवाहिन्यातून व्यवस्थित वाहता यावं म्हणून अशा टेकड्या चढणं म्हणजेच रक्तवाहिन्या साफ करण्यासारखं आहे. त्यानुसार या नागद्वार यात्रेची गरज व त्याचं नियोजन आपल्या पुर्वजांनी करुन दिलेलं आहे. कमीतकमी वर्षातून एकदा तरी ही यात्रा करावी. असं आपल्या पुर्वजांनी आपल्याला शिकविलंय. त्यामुळं आपण दरवर्षी नागद्वार यात्रेला नक्कीच जात असतो. तिथं चालणं कठीण असलं तरी. आता राहिला प्रश्न भाविकतेचा. तर आपल्या पुर्वजांनी या नागद्वार यात्रेमध्ये दुरदर्शिपणा लक्षात घेऊन भाविकता जोडली आणि भाविकतेत अंधश्रद्धा. जर ती भाविकता आणि अंधश्रद्धा आपल्या पुर्वजांनी त्यात शिरवली नसता तर कोणताच व्यक्ती नागद्वारसारखी कठीण यात्रा करायला गेलाच नसता.

**अंकुश शिंगाडे**
नागपूर

नागद्वार यात्रा ही श्रावण महिन्यातच येते. त्याचं कारण आहे पाऊस. पाऊस जर असेल तर नागद्वारची यात्रा करणं अतिशय सुलभ असतं. त्रास वाटत नाही कोणत्याही पद्धतीचा वरुन भाविकताही सोबतीला असते आणि अंधश्रद्धाही. त्यामुळं थकवा देखील पुरेसा जाणवत नाही. अशाच चालण्यानं शरीराची झीज होते. वाढलेलं वजन कमी होते. त्यानंतर असे व्यक्ती परत आले की कसनी करतात. कसनी अर्थात वेगळं राहाणं. त्याचंही एक कारण आहे. आपल्याला कुणाचा सव्वा महिने स्पर्श नको. कुणाच्या हातचं पाणी पिता येत नाही. अन्न खाता येत नाही. ज्या अन्नपाण्यात पावसाळ्यात वेगवेगळ्या प्रकारचे जंतू असतात. ते कुणाला स्पर्श केल्यास वा त्यांच्या हातून पाणी व अन्न ग्रहण केल्यास आपल्याला रोग होवू शकतात. याचाच अर्थ असा की आपल्या पुर्वजांनी किती नियोजन बद्ध रितीनं श्रावण महिन्यात नागद्वार यात्रेची निर्मिती केली असावी.

श्रावण मासातील तिसरा सण असतो रक्षाबंधन. या दिवशी भाऊ बहिणीच्या घरी जात असतो, वेळात वेळ काढून. ती कशी आहे, कोणत्या हालअपेष्टेत आहे, याची विचारणा करण्यासाठी. त्यातच तो तिला काही भेटवस्तूही देत असे आणि तिच्या सुखी जीवनाची कामना करीत असे. एवढंच नाही तर तोच भाऊ तिच्या रक्षणासाठी तिच्या घरी आल्यावर एक प्रकारचं रक्षासुत्र बांधून घेत असे व तद्नंतर तिच्यावर कधी संकट आल्यास तिच्या जीवाच्या रक्षणासाठी तो भाऊ धावून जात असे. हाच भाग होता पुर्वीपासूनच. कारण बहिणीचा विवाह झाल्यानंतर बहिण कधीच जात नव्हती आपल्या भावाला भेटायला. तिचा भाऊच यायचा. परंतु आता काळ बदलला व आता बहिण भावाच्या घरी रक्षासुत्र बांधायला जाते आणि स्वार्थ मनात भावाकडून काही भेटवस्तूची अपेक्षा करते. त्यातच तामसी जेवनाचीही अपेक्षा करते. हा सण कोळी बांधवांसाठी अतिशय महत्वाचा असून याच महिन्यापासून कोळी बांधवांच्या व्यवसायाला सुरुवात होते. कारण त्यापुर्वी समुद्र भरलेला असतो. ज्यातून त्यांना मासेमारी करता येत नाही. परंतु राखीपासून पाऊस कमी होत असल्यानं समुद्रात व्यवस्थित मासेमारी करता येते. म्हणून कोळी बांधव या दिवशी समुद्राला नारळ अर्पण करतात. या महिन्यातील चौथा सण असतो श्रीकृष्णजन्माष्टमी. या दिवशी भावीक आपल्या घरी क्रिष्णाची मातीची मुर्ती प्रस्थापित करतात व त्या दिवशी ते सात्वीक आहार ग्रहण करतात. अर्थात चणे व घनोले, लोऱ्या, सातू खाण्याची पद्धती आहे. ज्या पदार्थाच्या खाण्यातून पोटातील जंत बाहेर पडून पोट साफ होत असतो. शिवाय हा दिवस साजरा करीत असतांना भावीक नाचगाणे करतात. ज्यातून शरीराला ज्या व्यायामाची गरज असते. तो व्यायाम होतो. श्रावण महिन्यातील शेवटचा सण असतो पोळा. हा सण मोठ्या माणसांसाठी, बैलांसाठी व बालकांसाठी अतिशय महत्वाचा सण. या दिवशी मोठी माणसं आपल्या घरच्या बैलाला धुतात. त्याला सजवतात व पोळ्यात मिरवणूकीनं नेतात. त्यातच त्याला मोहफुलाची पुरणपोळी खावू घालतात. ज्यातून बैलाला बळ येतं, अशी आख्यायिका आहे. तसंच दुसऱ्या दिवशी लहान बैलाचा पोळा राहात असून या दिवशी लहान मुलं आपल्या लाकडाच्या नंदीबैलाला पोळ्यात नेतात व मौजमजा करीत असतात. त्याही दृष्टीकोनातून हा महिना महत्वपुर्ण. एकंदरीत सांगायचं झाल्यास महाराष्ट्रात श्रावण महिन्यात सणांची रेलचेल असून आपल्या पुर्वजांनी अतिशय नियोजनबद्ध रितीनं या महिन्यात सणांची आखणी केलेली आहे. तसं पाहिल्यास या महिन्यात मांसाहाराला वज्र मानलं जातं. त्याचं कारण आहे, वेगवेगळ्या प्राण्यांच्या शरीरात असलेले व पावसातून उद्भवणारे आजार. ते माणसाला होवू नये. यासाठी पाळला जाणारा मांसाहार वज्रचा नियम. शिवाय नागद्वार यात्रेतून शरीरातील कोलेस्टेरॉलवर नियंत्रण. चणे, सातू खाण्यातून पोट साफ होणं व लाह्या खाण्यातून शरीराची प्रतिकारशक्ती वाढवणं या साऱ्याच गोष्टी. एवढंच नाही तर बैलाचीही प्रतिकारशक्ती वाढविण्याची गोष्ट. नागाला न मारण्याचा संदेश. या सर्वबाबी श्रावणच महिन्यात घडत असतात. त्यातच पर्यावरणाचं संवर्धन, संरक्षण आणि इतर बरंच काही याच श्रावण महिन्यात घडत असतं. एवढंच नाही तर या महिन्यात असंही आल्हाददायक वातावरण असतं की त्या वातावरणातून मन तरल होतं. याचाच अर्थ मनाचीही शुद्धता होत असते. हे तेवढंच खरं. अन् हे मन शुद्ध करण्यासाठी दिपपुजा, नागद्वार यात्रा, गोकुळाष्टमी, बैलाचं पुजन, रक्षासुत्र इत्यादी गोष्टीवरुन सोबतीला पाऊस. या सर्वांच्या ताळमेळानं श्रावण सजतो नव्हे तर सजवला जातो. म्हणूनच महाराष्ट्र सुजलाम, सुफलाम दिसतो. तरीही काही लोकँश्रावणाला गालबोट लावतात. भलतेच विचित्र प्रकार करुन. जसं दहीहंडी अतिशय उंचावर लावणे. ज्याठिकाणी काळजी न घेतल्यानं पडून जीव जातो. नागद्वार यात्रेत दारु पिणे. ज्यातून पडून जीव जातो. तसंच श्रीकृष्णाची मुर्ती खोल पाण्यात शिरविणे. समुद्राला नारळ खोल पाण्यात नेवून अर्पण करणे. ज्यात काळजी न घेतल्यानं पाण्यात पडून जीव जातो. अशा विचित्र प्रकारानं श्रावण बदनाम होतो. दोष आपलाच असतो आणि आपण श्रावणाला बदनाम करीत असतो. महत्वाचं सांगायचं झाल्यास श्रावण महिना दरवर्षी येतो व या महिन्याचे नियम काटेकोरपणाने पाळले तर नक्कीच आपल्याला आणि आपल्या शरीराला फायदा होत असतो. परंतु आपण जर ते नियम व्यवस्थित पाळले तर...नाहीतर बाच श्रावण क्रोधीत होवून आपल्यालाच त्रास देत असतो. ज्याची परियंती आपल्या मृत्यूत होते. म्हणूनच श्रावण व्यवस्थित पाळावा व आपल्या सुखी व दिर्घायू आयुष्याची कामना करावी. मग ही बाब अंधश्रद्धा म्हणून का असेना. पण हे सत्य आहे. यात शंका नाही.

# महिला आरक्षणाबद्दल पंतप्रधानांचे आवाहन

१५ ऑगस्ट. आपला भारत स्वतंत्र झाला. देशभर स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांचा उल्लेख केला. त्यामध्ये लोकसभा आणि राज्यसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याच्या निर्णयाचाही उल्लेख करण्यात आला. विरोधी पक्षाचे नाव न घेता याबाबतचा उल्लेख करण्यात आला.

महिलांना राजकीय क्षेत्रात अधिक प्रतिनिधित्व मिळणे ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे. मात्र, या निर्णयाचा राष्ट्रीय पातळीवर नेमका किती फायदा होणार आणि त्याची अंमलबजावणी कशी होणार, याबाबत चर्चा होणे आवश्यक आहे. आज आपण पाहतो की, संसदेत किती दिवस कामकाज चालते? किती खासदार जनतेचे प्रश्न हिरिरीने मांडतात? किती खासदार देशहिताचे, जनतेच्या शिक्षणाचे, आरोग्याचे तसेच प्रत्येक गावात आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याचे प्रश्न प्रभावीपणे मांडतात? या प्रश्नांवरही गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे.केवळ महिलांसाठी जागांची संख्या वाढविणे पुरेसे आहे का? सध्याच्या ५४३ लोकसभा सदस्यसंख्येऐवजी ८१६ किँवा ८५० सदस्य करण्याची गरज आहे का, यावरही विचारमंथन होणे आवश्यक आहे.सध्याच्या परिस्थितीत प्रत्येक खासदाराला वेतन व भत्ते मिळतात. एका खासदारामागे दरमहा सुमारे अडीच लाख रुपये खर्च होतो. ५४३ खासदारांचा विचार केला तर हा खर्च मोठा आहे. महिलांचे प्रतिनिधित्व वाढल्यास खर्चातही मोठी वाढ होईल. त्यामुळे महिला आरक्षणासोबतच संसद सदस्यांची कार्यक्षमता, जबाबदारी आणि जनतेप्रती असलेली बांधिलकी यांचाही विचार झाला पाहिजे. महिला खासदार असली तरी तिचा पती, मुलगा, मुलगी किँवा जावई प्रशासनाच्या कामकाजात हस्तक्षेप करीत असल्याचे अनेकदा दिसून येते. त्यामुळे



केवळ आरक्षण देऊन महिलांचे राजकीय सक्षमीकरण पूर्ण होणार नाही. महिलांना स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची आणि प्रभावीपणे काम करण्याची संधी मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे. डिलिमिटेशनमुळे लोकसभा मतदारसंघांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे सध्याच्या ५४३ सदस्यांऐवजी भविष्यात ८१६ किंवा ८५० सदस्यसंख्या होऊ शकते. अशा परिस्थितीत ३३ टक्के आरक्षणानुसार महिलांना मोठ्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळेल. या पार्श्वभूमीवर काँग्रेस, आम आदमी पक्ष आणि इतर विरोधी पक्षांनी महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याची भूमिका घेतली आहे. ५४३ जागांपैकी सुमारे १८० जागा महिलांसाठी राखीव ठेवण्याचा प्रस्ताव याच अनुषंगाने महत्त्वाचा ठरतो. लोकशाहीच्या दृष्टीने पाहता, महिलांना योग्य प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे केंद्र सरकारने महिलांच्या राजकीय सहभागाचा व्यापक विचार करून आगामी निवडणुकीत ५४३ सदस्यांपैकी १८० जागा महिलांसाठी राखीव करण्याच्या दिशेने ठोस निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा आहे. तसेच पक्षांतराला आळा घालण्यासाठी कठोर नियम करण्याची गरज आहे. एका पक्षाच्या चिन्हावर निवडून आल्यानंतर दुसऱ्या पक्षात जाणाऱ्या लोकप्रतिनिधींवर प्रभावी कारवाई झाली पाहिजे. अशा प्रकारे पक्षांतर रोखण्यासाठी स्पष्ट आणि कठोर कायदेशीर तरतुदी असणे गरजेचे आहे.

महिला आरक्षणाचा निर्णय केवळ राजकीय गणितापुरता मर्यादित न राहता महिलांना खऱ्या अर्थाने राजकीय सक्षमता देणारा ठरला पाहिजे. त्यासाठी आरक्षणासोबतच लोक-प्रतिनिधींची जबाबदारी, कार्यक्षमता, जनतेशी असलेला संवाद आणि प्रशासनातील पारदर्शकता यांनाही समान महत्त्व दिले पाहिजे. महिलांना संसदेत अधिक प्रतिनिधित्व मिळणे ही लोकशाहीसाठी सकारात्मक बाब आहे. मात्र, हा निर्णय व्यापक जनहित, सक्षम लोकप्रतिनिधित्व आणि प्रभावी प्रशासन या तीनही बाबींचा समतोल साधणारा असणे आवश्यक आहे.

**शशिमोहन नंदा**
नांदेड.मो.९४२२९०४७७७

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# किवळा येथील जुगार अड्ड्यावर पोलीसांची धाड



नांदेड/प्रतिनिधी-किवळा येथे सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर विशेष पोलीस उपमहानिरिक्षक शहाजी उमाप यांच्या कार्यालयातील पोलीस पथकाने रविवारी धाड टाकुन बारा जणांना अटक करण्यात आली.

किवळा येथे जुगार अड्डा सुरु असल्याची तक्रार विशेष पोलीस उपमहानिरिक्षक कार्यालयात करण्यात आली होती. पोलीस उपमहानिरिक्षक शहाजी उमाप यांच्या आदेशावरुन रविवारी पोलीसांच्या एका पथकाने सदरील जुगार अड्ड्यावर अचानक छापा टाकला. जुगार खेळणाऱ्या बारा जणांना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यांच्याकडून रोख रक्कम, चार दुचाकी, पाच मोबाईल असा ३ लाख ४५ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. याप्रकरणी बारा जणांविरुध्द उस्माननगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ट्रॅव्हल्सखाली चिरडून दोन महिला भाविकांचा मृत्यू;तेलंगणा यंत्रणेच्या कारभारावरही प्रश्नचिन्ह

## अपघाताच्या घटनेची चौकशीची मागणी



किनवट/प्रतिनिधी- तेलंगणा राज्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र.४४, या वाहनांची वर्दळ असलेल्या महामार्गावर १३ ऑगस्ट रोजी झालेल्या भिषण अपघातात किनवटच्या दोन निष्पाप महिलांचा त्यांच्याच प्रवासाच्या ट्रॅव्हल्सखाली चिरडून दूर्दैवी मृत्यू झालाय. उल्लेखनीय म्हणजे घटनेनंतर दोन तास तेलंगणा वाहतूक व्यवस्था आणि राष्ट्रीय महामार्ग आपत्कालीन यंत्रणा पोहोचली नाही. त्यामुळे त्यांच्यासह ट्रॅव्हल्स चालक, मालक, यात्रा आयोजकांची चौकशी करून जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्याची मागणी भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य अशोक नेम्मानिवारांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे केली आहे.

महाराष्ट्र आणि तेलंगणा राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी दखल घेतल्यानंतर हे प्रकरण कित्येकांच्या अंगलट येणार ते पहायला मिळणार असल्याचे बोलल्या जात आहे.जबाबदारी निश्चित करण्याबरोबरच हैदराबाद येथील चिन्मय जियार स्वामीं (चिन्ना जियार स्वामी) च्या आश्रमासह व्यवस्थेची देखील सखोल चौकशी करण्याच्या मागणीसह नेम्मानिवारांनी तेलंगणा राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे संपर्क साधून पूर्ण अपघात प्रकरणाची आणि प्रकरणाशी संबंधित कारणीभूत ठरलेल्यांच्या विरुद्ध चौकशी आणि कारवाईची मागणी करणारे पत्र महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे पाठवले आहे. ज्यांनी ६० महिलांचा मेळ जमऊन किनवट ते हैदराबाद यात्रा आयोजन केले त्यांच्यासह ट्रॅव्हल्स चालक, मालक, राष्ट्रीय महामार्ग आपत्कालीन यंत्रणा आणि तेलंगणा राज्याची त्या मार्गाशी निगडित रस्ते वाहतूक व्यवस्थासुद्धा तेवढीच जबाबदार आहे. कारण अपघातानंतर जवळपास दोन तास कोणतीही यंत्रणा घटनास्थळी पोहोचली नव्हती म्हणून ते सुद्धा तेवढेच जबाबदार असल्याचा मुद्दा मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात नमूद केलाय. तेलंगणातील आरमूर मंडळातील गणेशपेठ जवळ सौ.सुजाता अशोक नेम्मानिवार आणि सौ.माधवी किरण तिरमनवार या दोघी आदिलाबाद येथील ट्रॅव्हल्स क्र.टी.जी.२१-टी.२१७२ या गाडीखाली चिरडून मृत्यूमुखी पडल्या. त्यामुळे ट्रॅव्हल्सची फिटनेस, टायरची गुणवत्ता आणि इतर तांत्रिकदृष्ट्या, वाहतूक विभागाच्या निकषपूर्ण नियमांशी सुसंगत होत्या का? यांचीही चौकशी झाली पाहिजे. दरम्यान दोषी आढळणाऱ्या संयोजक, संबंधित व्यक्ती, यंत्रणा अथवा संस्थांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, कारण दोन कुटूंबे उद्ध्वस्त झाली आहेत. हा अपघात म्हणावा तेवढा हलक्यात घेण्यायोग्य नाही. याचा सोक्षमोक्ष लावल्या शिवाय प्रकरण थंडावणार नसल्याचे दिसते. मृतांच्या कुटूंबीयांना व जखमी महिला भाविकांना योग्य ती शासकीय मदत मिळवून देण्यात यावी, अशी अशोक नेम्मानिवारांनी १८ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्र्यांकडे पाठवलेल्या पत्रात मागणी केली आहे.

# रेतीची अवैध वाहतूक करणाऱ्या तीन वाहनांवर इतवारा डीवायएसपीच्या पथकाची कारवाई



नांदेड/प्रतिनिधी- अवैधरित्या रेती वाहतूक करणाऱ्या तीन वाहनांवर आज (बुधवार) पहाटे इतवारा विभागाचे पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे यांच्या कार्यालयातील पोलीस पथकाने कारवाई करुन वाहने जप्त केली आहेत.

पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या आदेशावरुन नांदेड जिल्ह्यात सुरु असलेल्या विशेष मोहिमे दरम्यान इतवारा विभागाचे पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे यांच्या आदेशावरुन कार्यालयातील पोलीस पथकाने आज बुधवारी पहाटे काळेश्वर-विष्णुपुरी मार्गावरील नवीन ब्रीज जवळ अवैधरित्या रेती वाहतूक करणारे टाटा ४०७ या कंपनीचे तीन वाहन पोलीसांनी पकडले. तीन वाहनांची तपासणी केली असता त्यामध्ये प्रत्येकी एक ब्रास रेती आढळून आली. वाहन चालकाकडे रेती वाहतुकीसाठी आवश्यक असलेली परवानगी व कागदपत्रे नव्हती. पोलीसांनी तीन्ही वाहन व रेती असा १२ लाख १५ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात चालक अयुब इस्माईल शेख (वय ३७) रा.सैलाबनगर, नांदेड, दिनकर सिताराम धोंडगे रा.जुना कौठा, नांदेड, किरण प्रल्हाद हणमंते रा.तेहरानगर, नांदेड यांच्या विरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून तीन्ही आरोपींना पोलीसांनी अटक केली.

# देगलूर मतदारसंघातून ३९ हजार मतदारांची नावे वगळली जाणार?

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर विधानसभा मतदारसंघातील मतदार यादीच्या विशेष पडताळणी मोहिमेत तब्बल ३९ हजार ३०६ मतदार स्थलांतरित, दुबार अथवा मयत असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे मतदार यादीतील एवढ्या मोठ्या संख्येने नावे वगळली जाणार का, याकडे आता राजकीय वर्तुळासह नागरिकांचे लक्ष लागले आहे.

देगलूर विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख ६५ हजार ६७८ मतदार आहेत. या मतदारांची २९ जून ते १७ ऑगस्ट या कालावधीत विशेष पडताळणी करण्यात आली. बिलोली व देगलूर तालुक्यातील ३५१ मतदान केंद्रांवर ३५१ मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी (बीएलओ) घरोघरी जाऊन मतदारांची माहिती तपासली. या पडताळणीदरम्यान स्थलांतरित झालेले, दुबार नोंद असलेले तसेच मयत मतदारांची माहिती संकलित करण्यात आली. त्यातून ३९ हजार ३०६ मतदार दुबार अथवा मयत असल्याचे निष्पन्न झाले. या नोंदींच्या पुढील कार्यवाहीकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.ही विशेष पडताळणी मोहीम उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. बिलोलीचे तहसीलदार गजानन शिंदे, देगलूरचे तहसीलदार भरत सूर्यवंशी, नायब तहसीलदार पद्मावार व दीपक मरळे यांनी मोहिमेचे नियोजन केले.

# निवडणूक आयोगाने शिवसेना विकली;अमित शाह दलाल:राऊत

मुंबई/प्रतिनिधी-शिवसेना नाव आणि धनुष्यबाण चिन्हाच्या वादावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असताना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले. निवडणूक आयोगाने पक्ष आणि चिन्ह शिंदे गटाला विकले असून या व्यवहारात हजारो कोटींची देवाणघेवाण झाली. यात अमित शाह यांनी दलाली केली, असा आरोप राऊत यांनी बुधवारी प्रसारमाध्यमांशी बोलताना केला. हे आरोप आपण ऑन रेकॉर्ड करीत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.विधानसभा अध्यक्ष आणि निवडणूक आयोगाने बेकायदेशीर निर्णय घेऊन संविधानाची पायमल्ली केल्याचा आरोपही राऊत यांनी केला. सर्वोच्च न्यायालयात कपिल सिब्बल यांनी उत्तम युक्तिवाद केला असून, न्यायालयात संविधान आणि न्यायाचाच विजय होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राऊत यांच्या आरोपांवर भाजप आणि निवडणूक आयोगाकडून काय प्रतिक्रिया येते, याकडे लक्ष लागले आहे.

# प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित मागण्यांसाठी हसनाळवासियांचे जलसमाधी आंदोलन



मुखेड/प्रतिनिधी- तालुक्यातील गोणेगाव येथील बहुचर्चित लेंडी मध्यम प्रकल्पामुळे बाधित झालेल्या हसनाळ (प.मु.) व परिसरातील प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित मागण्या तातडीने मंजूर कराव्यात, तसेच पुनर्वसन पूर्ण होण्यापूर्वी करण्यात आलेल्या गळभरणीच्या परवानगीची निष्पक्ष चौकशी करावी यासह १२ मागण्यांसाठी हसनाळ (पमु) येथील नागरिकांनी १८ ऑगस्ट रोजी जलसमाधी आंदोलन सुरू केले आहे.

लेंडी मध्यम प्रकल्पामुळे हसनाळ (पमु) व परिसरातील नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. वर्षभरापूर्वी हसनाळ(पमु) येथील पाच नागरिकांचा मृत्यू झाला आणि शेकडो कुटूंबे बेघर झाली आहेत. या घटनेला जवळपास एक वर्ष पूर्ण होत असतानाही अनेक प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसन व आर्थिक मदतीच्या मागण्या अद्याप प्रलंबित आहेत. 'आधी पुनर्वसन, मग धरण' या धोरणाची अंमलबजावणी न करता गळभरणीस परवानगी कशी देण्यात आली? असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे. प्रकल्पग्रस्तांचे सुरक्षित पुनर्वसन व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी असल्याचे नमूद करून गळभरणीच्या परवानगीची चौकशी करून संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे.हसनाळ (प.मु.) येथील पात्र लाभार्थ्यांना प्रलंबित एक लाख रुपये वाहतूक भत्ता तातडीने देण्यात यावा, पुनर्वसन गावासाठी संरक्षण भिंत बांधावी, चार गावांच्या पुनर्वसनासाठी सर्व ऋतूंमध्ये वाहतुकीस योग्य पक्का रस्ता करावा, तसेच प्रलंबित सानुग्रह अनुदान तातडीने वितरित करावे, खासगी पुनर्वसन माऊली मंदिर रस्ता मंजूर करून पूर्ण करणे, बस्वनामाळ येथे बोअरवेल करून कायमस्वरूपी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, खानापूर पुनर्वसनातील प्लॉट लगतची स्मशानभूमी अन्यत्र स्थलांतरित करणे किंवा संबंधित कुटूंबांना पर्यायी प्लॉट देण्यात यावा आदी मागण्यांचाही समावेश आहे.

# मांडवी पोलीसांनी ट्रॅक्टर केले जप्त

नांदेड/प्रतिनिधी-उनकेश्वर ते सायाळ रोडवर अवैधरित्या रेती वाहतूक करणारे ट्रॅक्टर मंगळवारी सायंकाळी मांडवी पोलीसांनी पकडले आहे. ट्रॅक्टर क्र.टी.जी.-०१-ए-९९०२ या वाहनात अवैधरित्या रेती भरुन घेवून जात असतांना उनकेश्वर ते सायाळ रोडवर सदरील ट्रॅक्टर पोलीसांनी पकडले. या प्रकरणी तीन जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


## जाहीर प्रगटन

मा.आर.पी.शिंदे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज १२३०/२०२६
रेहाना व ईतर वि. निरंक
ने. ता. ०३/१०/२०२६

अर्जदार:- १. रेहाना बेगम भ्र.मोहम्मद नजीर खान, वय ५५ वर्षे, व्यवसाय-घरकाम, रा.खुसरु नगर, देगलुर नाका, ईतवारा, नांदेड ता.जि.नांदेड, २. फेरोज खान पि.नजीर खान, वय ४० वर्षे, व्यवसाय-व्यापार, रा.उमर कॉलनी, देगलुर नाका, ईतवारा, नांदेड ता.जि.नांदेड, ३. शाहीन रब्बानी बेगम भ्र.अब्दुल मतीन खान, वय ४० वर्षे, व्यवसाय-घरकाम, रा.मोहसीन कॉलनी, देगलुर नाका, ईतवारा, नांदेड ता.जि.नांदेड, ४. मोहम्मद सलीम खान पि.मोहम्मद नजीर खान, वय ३० वर्षे, व्यवसाय-व्यापार, रा.खुसरु नगर, देगलुर नाका, ईतवारा, नांदेड ता.जि.नांदेड, ५. इरफान खान पि.मोहम्मद नजीर, वय ३९ वर्षे, व्यवसाय-व्यापार, रा.खुसरु नगर, देगलुर नाका, ईतवारा, नांदेड ता.जि.नांदेड.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

दावा: बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारसहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, मयत मोहम्मद नजीर पि.मोहम्मद सरवर यांचा मृत्यु दिनांक ०९/०२/२०२४ रोजी, नांदेड येथे झाला आहे. अर्जदार क्रमांक १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्र. २,४,५ हे मयताचे मुले आहेत व अर्जदार क्र.३ ही मयताची मुलगी आहे. सदरच्या अर्जात अर्जदारांनी अर्जदार क्रमांक १ ते ५ हे मयताचे वारसदार आहेत असे नमुद केले आहे. अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटणा द्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत ३० दिवसाच्या आत किंवा दिनांक ०३/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जवाबदारी आपणावर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १८/०८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
क. लिपिक
सह दिवाणी न्यायालय,
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड



जे- /सोसा/२५५८/२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग,नांदेड
दिनांक - १८/८/२६

## चौकशीची जाहीर नोटीस

अर्ज क्रमांक १३६६/२६ कलम १९

सार्वजनिक न्यासाचे नांव : ज्ञानसंवर्धन सार्वजनिक वाचनालय ताटकळवाडी पो.वाकत ता.भोकर जि.नांदेड

अर्जदार नांव : पल्लवी उत्तम तायवाडे

सर्व संबधित लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड, विभाग नांदेड हे वर नमुद केलेल्या अहवाल अर्ज या संबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१. वर नमुद केलेला सार्वजनिक न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

२. खालील निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीचा आहे काय?

अ) जंगम मिळकत (वर्णन) : अर्जदार यांच्याकडे सभासद फी रुपये ७०७/- जमा आहेत.

ब) सदर मिळकत (वर्णन) :

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देण्याचा असेल त्यांनी त्याची लेखी कैफियत हि नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखे पासून तीस दिवसाच्या आत या कार्यालयाच्या पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे, त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाच्या निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जाईल.

ही नोटीस माझ्या सहीनिशी व मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड यांचे शिक्यानिशी आज दिनांक १८/०८/२०२६ रोजी दिली.

स्वाक्षरित/-
**(श्रीरामे बि.एन.)**
**वरिष्ठ लिपिक**
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय,नांदेड विभाग नांदेड

स्वाक्षरित/-
**(श्रीमती पिं.ज.रॉय)**
**(अधिक्षक)**
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय,नांदेड विभाग नांदेड



जा.क्र.नांवाशमनपा/क्षे.का.०१/नापवि/९८४/२०२६
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक : ११-८-२०२६

## जाहीर प्रगटन

**संचिका क्रं.NT/०१/१४४३५/क्षे.का.क्र.१ तरोडा-सांगवी**
**प्रकरण : नांव परिवर्तन करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की सौ. **रुपाली राहुल गच्चे** रा.**तरोडा खु., नांदेड** यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, ता.नि.भु.अ.पत्र क्र.**१०५१/०९ दि.३०/१०/२००९ तरोडा खु. गट नं.१५७,१५८,१५९, १६० पैकी प्लॉट क्रं.४/२ पिन क्र.४०६०१०५९९९** सौ. **कलावती रामराव भोजने व इतर** यांच्या नावे असलेली मालमत्ता यांचेकडुन अर्ज **खरेदीखत क्र.७०८१ दि.११/०७/२०२३** च्या आधारे विकत घेतली आहे./वारसा हक्क प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नांवे कर आकारणी नोंद वहीत घेण्यासाठी जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

तरी या संबंधात कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून (१५) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. अन्यथा अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नांवे वरील प्रमाणे मालमत्ता नोंदविण्यात येईल.

**चर्तुःसिमाः- पुर्व**- श्रीपती यांचा प्लॉट आहे, **पश्चिम-** सावळे यांचा प्लॉट आहे, **दक्षिण-**२० फुट रुंद रोड आहे, **उत्तर-** कल्याणकर यांचा प्लॉट आहे.

स्वाक्षरित/-
**सहाय्यक आयुक्त**
क्षे.का.क्रं.०१ तरोडा सांगवी,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड



CHANGE IN NAME

My (old name) is **MANDHANI ROHAN SACHINKUMAR** which now I am, changing as (new name) **ROHAN SACHIN MANDHANI**
Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.
Sign by
**ROHAN SACHIN MANDHANI**
R/o Harikamal Dayma estate, main road
old Kaotha Nanded-431603
M.No.- 9130030083



CHANGE IN NAME

My (old name) is **SACHINKUMAR HARIPRASAD MANDHANI** which now I am, changing as (new name) **SACHIN HARIPRASAD MANDHANI**
Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.
Sign by
**SACHIN HARIPRASAD MANDHANI**
R/o Harikamal Dayma estate, main road
old Kaotha Nanded-431603
M.No.- 9028786296

# मी दिलेला निर्णय अत्यंत शाश्वत;त्यात बदल होईल असे वाटत नाही:राहुल नार्वेकर

## शिवसेना प्रकरणी कपिल सिब्बल यांच्या युक्तिवादावर नार्वेकरांची स्पष्ट भूमिका

सरफराज दोसानी

माहूर:शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण निवडणूक चिन्हाच्या वादावर सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणी दरम्यान ठाकरे गटाच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या निर्णयावर आक्षेप घेतले. याबाबत प्रतिक्रिया देताना, मी दिलेला निर्णय अत्यंत शाश्वत असून सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकषांच्या आधारावरच हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे यात कुठला बदल होईल, असे मला वाटत नाही, असे ठाम मत राहुल नार्वेकर यांनी व्यक्त केले.

मंगळवारी (दि.१८) यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी येथील माजी आमदार ख्वाजा बेग यांच्या निवासस्थानी राहुल नार्वेकर यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी शिवसेना प्रकरणावर भाष्य केले. कपिल सिब्बल हे त्यांच्या पक्षकाराच्या वतीने युक्तिवाद करीत आहेत. ते काय म्हणत आहेत, यावरून काही सिद्ध होत नाही. आपण घेतलेली भूमिका आणि दिलेला निर्णय हा कायद्याच्या चौकटीत असून, सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी निश्चित केलेल्या निकषांच्या आधारेच निर्णय घेण्यात आला आहे, असे नार्वेकर यांनी स्पष्ट केले. कपिल सिब्बल हे त्यांच्या पक्षकाराच्या बाजूने युक्तिवाद करीत आहेत. त्यामुळे त्यांनी केलेले आरोप म्हणजे ते सत्य आहेत, असे होत नाही. विधानसभा अध्यक्षांनी नेमके काय ठरवले, हे त्यांना कसे माहीत? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. आपला निर्णय कायदेशीर आधारावर आणि सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या निकषांनुसार असल्याचा पुनरुच्चार करताना नार्वेकर म्हणाले, बिनबुडाचे आरोप केल्याने माझ्या निर्णयावर कोणताही फरक पडत नाही. मी दिलेला निर्णय अत्यंत शाश्वत आहे. त्यामुळे त्यात कुठला बदल होईल, असे मला वाटत नाही. यावेळी



उमरखेडचे आमदार किशनराव वानखेडे, माजी आमदार ख्वाजा बेग, भाजपा पुसद जिल्हा समन्वयक नितीन भूतडा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## छात्रोंकी गूंज कार्यक्रमात युवतींनी सहभाग घ्यावा-खा.रवींद्र चव्हाण

नांदेड/प्रतिनिधी-लोकसभेचे विरोधी पक्षनेते तथा काँग्रेस नेते खा. राहूल गांधी यांचा छात्रोंकी गूंज महिला विशेष हा महा कार्यक्रम शनिवार दि.२२ ऑगस्ट रोजी पुणे येथे होत असून, मुलींच्या प्रश्नांना, स्वप्नांना व संघर्षाला हक्काचं व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. यामुळे युवतींनी जास्तीत जास्त संख्येने या कार्यक्रमात सहभाग घ्यावा असे आवाहन काँग्रेस दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा खा.रवींद्र चव्हाण, उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांनी केले आहे.

राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली छात्रोंकी गूंज हा विद्यार्थ्यांच्या समस्या, पेपर फुटी आणि शिक्षण व्यवस्थेविषयी संवाद साधणारा महत्त्वाचा कार्यक्रम आहे. आजवर कोटा, डेहराडून व प्रयागराज या तीन ठिकाणी हा कार्यक्रम संपन्न झाला असून विद्यार्थी वर्गाचा प्रचंड मोठा प्रतिसाद मिळाला आहे. दरम्यान खा. राहूल गांधी यांच्या उपस्थितीत, पुणे येथील एआयएसएसएमएस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे शनिवार दि. २२ रोजी सायंकाळी पाच वाजता छात्रोंकी गूज महिला विशेष हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. मुलींच्या प्रश्नांना, स्वप्नांना व संघर्षाला हक्काचं व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. यामुळे युवतींनी जास्तीत जास्त संख्येने या कार्यक्रमात सहभाग घ्यावा असे आवाहन खा. रवींद्र चव्हाण, विठ्ठल पावडे, अब्दुल गफ्फार यांनी केले आहे.



लायन्स नांदेड मिडटाऊन डायबेटीस केअर सेंटर आणि संयुक्त उपक्रमांच्या वतीने शिराढोण येथे आज मोफत नेत्र-मधुमेह व थायरॉईड तपासणी शिबिर उत्साहात संपन्न झाले.त्यात नेत्र-मधुमेह व थायरॉईड संदर्भातील तपासणी, पुढील उपचारांबाबत नागरिकांना तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले.शिबिरासाठी डॉ. जयश्री आठाव (बोडके), एमबीबीएस, डी. डायबेटोलॉजी (मुंबई), डायबेटीस व थायरॉईड तज्ज्ञ यांचे मार्गदर्शन लाभले.यावेळी सरपंच खुशाल पांडागळे, लायन्स क्लबचे जीएमटी समन्वयक ला.रवी कडगे,क्लब प्रशासक ला.सतीश सामते, ला.विजय होकर्णे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## रेणुका पाचपुतेंच्या उपोषणाला सहाव्या दिवशी पूर्णविराम;विभागीय चौकशीचे आश्वासन

किनवट/प्रतिनिधी-जलधरा येथील तत्कालीन आशा कार्यकर्ती सौ.रेणुका श्रीराम पाचपुते यांना किनवट तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी १८ ऑगस्ट रोजी दिलेल्या लेखी आश्वासन पत्रानंतर बेमुदत आमरण उपोषणाच्या सहाव्या दिवशी उपोषणाला पूर्णविराम दिल्याचे सूत्रांनी सांगितले. १३ ऑगस्ट पासून तालुका आरोग्य अधिकाऱ्यांच्या कार्यालयासमोर उपोषणाला सुरुवात केली होती. मारोती सुंकलवाड यांच्या शिष्टमंडळाच्या अंगदशिष्ठाईमुळे आरोग्य अधिकारी आणि आदिवासी महिला उपोषणार्थी यांच्यातील वादावर तुर्तास तरी पडदा पडल्याचे ऐकायला मिळाले.

१३ ऑगस्ट रोजी न्यायमागणी घेऊन बेमुदत आमरण उपोषणाला बसलेल्या सौ.रेणुका पाचपुते यांच्या प्रकरणात जिल्हा स्तरावरील चौकशी त्यांना अमान्य असल्यामुळे सौ.पाचपुतेंची विभागीय चौकशीची मागणी असल्यामुळे ती मान्य करीत, परवानगीसाठी वरिष्ठांकडे पाठवण्याचे आरोग्य अधिकाऱ्यांनी आश्वासन दिले आहे. चौकशी समितीच्या निष्कर्षात सौ.पाचपुते निर्दोष असल्यास त्यांना आशा कार्यकर्ती पदावर सामाऊन घेण्याचे दुसऱ्या मुद्द्यात नमूद केले आहे.आता महत्वाचा कळीचा मुद्दा असा आहे की, दोन पेक्षा जास्त अपत्याचा. जुलै नंतरच्या भरती प्रक्रियेतील उमेदवारांना दोन पेक्षा जास्त हयात अपत्य असल्यास भरती प्रक्रियेत अपात्र असतील हा शासकीय दंडक असून लहान कुटुंब (दोन अपत्य) असल्यासच त्या पात्र उमेदवार असणार आहेत. आता सर्वचजन लहान कुटुंब (दोन अपत्य) मर्यादेच्या रेषेत येण्याची शक्यता व्यक्तविली गेली. कदाचित अपत्य संबंधाने पडताळणी/चौकशीअंती दोन पेक्षा अधिक अपत्यधारक आढळणाऱ्या आशा कार्यकर्तींच्या पदांवर गंडांतर येण्याची शक्यता आरोग्य अधिकाऱ्यांनी सौ.पाचपुतेंना दिलेल्या पत्रावरुन स्पष्ट दिसते. उपोषणार्थींच्या या प्रमुख तीन मागण्यांवर मारोती सुंकलवाड, चतुरंग कांबळे, संतोष सिसले, संदीप निखाते, सुरेश जाधव यांच्या अंगदशिष्ठाईच्या शिष्टमंडळाची आणि तालुका आरोग्य अधिकाऱ्यांच्या बैठकीत ओतप्रोत चर्चा करून हा मार्ग काढण्यात आल्याचे सांगितले.

## ऊस उत्पादकांना शेतकऱ्यांना अधिक भाव देण्याची शेतकरी संघर्ष समितीची मागणी

हदगांव/प्रतिनिधी-सध्या बाजारात साखरेला चांगला दर मिळत असल्याने साखर कारखान्यांना वाढीव उत्पन्न मिळत आहे. या पार्श्वभूमीवर ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या कष्टाचा योग्य मोबदला देणे ही साखर कारखानदारांची नैतिक जबाबदारी असल्याचे मत शेतकरी संघर्ष समिती, हदगावचे आत्माराम पाटील वाटेगावकर यांनी व्यक्त केले आहे.

शेतकरी हिताच्या भूमिकेतून सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याने ऊस उत्पादकांना अधिकचा भाव देण्याचा घेतलेला निर्णय कौतुकास्पद असून, नांदेड जिल्ह्यातील इतर साखर कारखान्यांनीही त्याचा आदर्श घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.साखरेच्या वाढलेल्या बाजारभावाचा योग्य लाभ ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळावा. मागील काळात देण्यात आलेल्या दरापेक्षा किमान ४०० रुपये अधिकचा भाव शेतकऱ्यांना देण्यात यावा, अशी अपेक्षा शेतकरी संघर्ष समितीने व्यक्त केली आहे.ऊस उत्पादनासाठी शेतकऱ्यांना वाढता उत्पादन खर्च, पाणी, वीज, खते, कीटकनाशके, मजुरी यांसह अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे साखरेला चांगला भाव मिळत असताना त्यातील योग्य वाटा शेतकऱ्यांच्या हातात जाणे आवश्यक आहे. आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या ऊस उत्पादकांना दिलासा देण्याची हीच योग्य वेळ असल्याचेही वाटेगावकर यांनी म्हटले आहे.शेतकरी जगला तरच साखर कारखाने जगतील आणि साखर उद्योगाची खरी प्रगती होईल. शेतकऱ्याच्या घामाला योग्य दाम मिळालाच पाहिजे, असे आवाहन आत्माराम पाटील वाटेगावकर यांनी केले.नांदेड जिल्ह्यातील सर्व साखर कारखानदारांनी शेतकरीहिताचा निर्णय घेत ऊस उत्पादकांना किमान ४०० रुपये अधिकचा भाव द्यावा, अशी मागणी शेतकरी संघर्ष समिती, हदगावच्या वतीने करण्यात आली आहे.

## उमरखेड नगरपरिषदेत आरोप-प्रत्यारोपांचा कलगीतुरा

### भाजपच्या आरोपांना जनशक्ती पॅनलचे सडेतोड उत्तर

उमरखेड/प्रतिनिधी-उमरखेड नगरपरिषदेच्या कारभारावरून सत्ताधारी जनशक्ती पॅनल आणि विरोधी भाजपमध्ये चांगलीच जुंपली असून आरोप आणि प्रत्यारोपांचा कलगीतुरा सुरू झाला आहे. भाजपने दोन दिवसांपूर्वी सत्ताधारी जनशक्ती पॅनल वर मनमानी कारभाराचा आरोप केल्यानंतर जनशक्ती पॅनलने लगेच मंगळवारी,१८ ऑगस्ट रोजी काँग्रेस कार्यालयात पत्रकार परिषद घेऊन भाजपने केलेले सर्वच आरोप खोडून काढत नगरपरिषदेतील सर्व कामे कायदेशीर व नियमानुसार सुरू असल्याचा दावा शिक्षण सभापती रसूल पटेल यांनी केला.

कंत्राटी भरतीवर केलेल्या आरोपांना प्रतिउत्तर देताना, पत्रकार परिषदेत त्यांनी सांगितले की, कँत्राटी शिक्षक भरती नवीन नसून २०१६-१७ पासून सुरू आहे. २२ जून २०१६ च्या ठराव क्र. ३ नुसार ७० लाखांची तरतूद होती, त्यानुसारच भरती सुरू आहे. ९९ कर्मचाऱ्यांत सेविका, लिपिक, सेवकांचाही समावेश असून शिक्षकांची संख्या ५५ च आहे.गढूळ पाण्याबाबत क्लोरीनचे दैनंदिन रिपोर्टिंग सुरू आहे. इसापूर ते उमरखेड पाणीपुरवठा योजनेचे ७८% काम पूर्ण झाले असून ते लवकर सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. स्वच्छता विभागा बाबत बोलतांना ते म्हणाले की, लेंडी नाल्याचे खोलीकरण व साफसफाई पूर्ण झाली आहे. मागील सत्ताकाळात ३ दिवसात ५६ किमी व ४ दिवसात १५६ किमी नाली सफाईचे बिल काढल्याचा आरोप करत चौकशीची मागणी केली.शहरात सध्या सुमारे ५० कोटींची विकासकामे नियमानुसार सुरू असून,मागील काळात स्मारक व पुतळ्यांच्या सौंदर्यीकरणावर अनावश्यक खर्च झाल्याचा आरोपही त्यांनी केला. ध्वजारोहणाच्या कार्यक्रमावरून भाजपने केलेल्या आरोपांवर स्पष्टीकरण देताना पटेल यांनी ९ जुलै २०२६ रोजी गृह मंत्रालय, भारत सरकार यांच्या आदेशानुसार शासकीय ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडल्याचे सांगितले. विरोधकांकडून केवळ विरोधासाठी आरोप केले जात असल्याची टीकाही त्यांनी यावेळी केली. सदर पत्रकार परिषदेला शिक्षण सभापती रसूल पटेल, आरोग्य सभापती वीरेंद्र खंदारे, उपाध्यक्ष जुबेर कुरेशी, महिला व बाल कल्याण सभापती फरजाना सय्यद रहीम, नगर सेवक गजानन रासकर, गणेश खंदारे उपस्थित होते.नगरपरिषदेच्या कामकाजावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांचा कलगीतुरा सुरू झाला असून, आगामी काळात हा वाद आणखी चिघळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## खा.रवींद्र चव्हाणांची आक्रमक भूमिका; तहसीलदाराच्या आश्वासनामुळे आठवलेंचे उपोषण मागे

मुदखेड/प्रतिनिधी-बारड येथील रस्त्याच्या मागणीसाठी कोंडीबा धोंडीबा आठवले यांनी बौद्ध वृक्ष पिंपळाच्या झाडाखाली उपोषणास बसले होते याची दखल घेऊन खा.रवींद्र चव्हाण यांनी उपोषणकर्त्यास भेट दिली व त्यांची सर्व बाजू ऐकून घेऊन प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतल्यामुळे प्रशासनाने लेखी आश्वासन दिल्याने उपोषण मागे घेण्यात आले.

जुन्या गावात जाणाऱ्या मुख्य रस्त्यासह नागरिकांना मूलभूत सुविधा मिळाव्या या मागणीसाठी आठवले यांनी गेल्या तीन दिवसापासून उपोषणास प्रारंभ केला होता. उपोषणाची खा.रवींद्र चव्हाण यांनी दखल घेत थेट उपोषणस्थळी भेट दिली. या रस्त्याच्या प्रमुख मागणी संदर्भात संबंधित प्रशासनाला जवाब विचारत खडे बोल सुनावले. यासोबतच या रस्त्यासाठी वापरण्यात आलेल्या निधीची चौकशीची करण्याचे आदेश दिल्यानंतर प्रशासनावर दबाव वाढला आहे. तहसीलदार आनंद देऊळगावकर, नायब तहसीलदार मारुती जगताप, गटविकास अधिकारी यांनी उपोषणकर्त्याची भूमिका समजावून घेतली. यानंतर एका महिन्यात पांदन ग्रामीण रस्ता मोकळा करून देण्याचे लेखी आश्वासन यावेळी दिले. गावातील नागरिकांना आवश्यक असणाऱ्या मूलभूत सुविधा दर्जेदार पद्धतीने उपलब्ध करून देण्याचे आश्वासन गटविकास अधिकारी देशमुख यांनी दिले. रस्त्याचा प्रश्न मार्गी लागताच गाव विकासासाठी १५ लक्ष रुपये निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन ग्रामस्थांना देण्यात आले आहे. रस्त्याचा प्रश्न वर्षानुवर्ष प्रलंबित असून केवळ आश्वासनावर वेळ मारून नेणे ऐवजी प्रत्यक्ष निधी लेखी आश्वासन मिळाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. लोकप्रतिनिधी तसेच प्रशासनाच्या सकारात्मक चर्चेनंतर धोंडीबा आठवले यांनी आमरण उपोषण स्थगित केले आहे. यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, हनुमंतराव पाटील राजेगोरे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, दादाराव पुयड नागेलीकर, प्रा.संदीप कुमार देशमुख व इतर उपस्थित होते.

## मराठी न शिकल्यास रिक्षा-टॅक्सी चालकांचा परवाना रद्द!

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील रिक्षा आणि टॅक्सी चालकांना २० ऑगस्टपासून व्यावहारिक मराठीचे ज्ञान असणे बंधनकारक करण्यात आले आहे. मराठीचे ज्ञान नसलेल्या चालकांना प्रथम एक महिन्याची मुदत दिली जाणार आहे. या कालावधीत मराठी शिकले नाहीत तर बॅज तीन महिन्यांसाठी निलंबित केला जाईल. त्यानंतरही मराठी शिकण्यास नकार दिल्यास बॅज आणि परवाना रद्द करण्याची कारवाई केली जाणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

राज्यात १९८९ पासून रिक्षा-टॅक्सी चालविण्यासाठी व्यावहारिक मराठीचे ज्ञान आवश्यक आहे. १२ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आलेल्या कायदेशीर तरतुदीनुसार या नियमाची काटेकोर अंमलबजावणी केली जाणार आहे. गेल्या १०५ दिवसांत राबविण्यात आलेल्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मराठी भाषा अभियानाला सुमारे १ लाख ६५ हजार ६०० अमराठी चालकांनी प्रतिसाद देत मराठीचे प्रशिक्षण घेतले. नवीन परवाना किंवा बॅज देताना आरटीओ अधिकाऱ्यांकडून चालकाच्या मराठी ज्ञानाची प्रत्यक्ष संवादाद्वारे तपासणी केली जाणार असून, त्याचे व्हिडिओ रेकॉर्डिंगही केले जाणार आहे. मराठीचे व्यावहारिक ज्ञान असल्याचे स्पष्ट झाल्यानंतरच बॅज दिला जाईल. दरम्यान, बनावट अधिवास प्रमाणपत्रांच्या आधारे परवाना व बॅज मिळविल्याच्या तक्रारींचीही चौकशी केली जाणार आहे. संबंधित व्यक्ती महाराष्ट्रात १५ वर्षांपासून वास्तव्यास आहे का, याची पडताळणी करून आवश्यकतेनुसार पोलिस चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.मराठी शिकणार नाही, बोलणार नाही अशी भूमिका घेणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई केली जाईल. मात्र, रोजगार हिरावून घेणे हा सरकारचा उद्देश नसून महाराष्ट्राच्या भाषा आणि संस्कृतीचा अभिमान राखणे हा या निर्णयामागील हेतू असल्याचे सरनाईक यांनी स्पष्ट केले. रिक्षा-टॅक्सी चालकांच्या कल्याणासाठीच्या आनंद दिघे महामंडळासाठी ५७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, ३७ हजारांहून अधिक चालक त्याचे सदस्य झाले आहेत.

## साईबाबा मंदिरात महाप्रसाद वाटपाचे आयोजन

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड/प्रतिनिधी-श्रावण मास निमित्ताने श्री साईबाबा मित्र मंडळ कौठा नांदेड यांच्या वतीने २० ऑगस्ट रोजी दुपारी १२ वा.साईबाबा मंदिर कौठा येथे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.दरवर्षी प्रमाणे याही वर्षी श्रावणमास निमित्ताने श्री साईबाबा मित्र मंडळ यांच्या वतीने श्रावण मास महिन्यातील गुरूवार रोजी दुपारी महाआरती नंतर १२ ते ३ दरम्यान महाप्रसाद आयोजित करण्यात आला असून भाविक भक्तांनी महाप्रसाद लाभ घेण्याचे आवाहन गंगाप्रसाद काकडे, माधव गुरूपवार, अशोक दिल्लेराव, रमेश यादव,हेमराज लड्डा,आकाश व साकेत व्यवहारे यांनी केले आहे.

पान १ वरुन

## शिवसेना नाव-चिन्ह...

उत्तरांमध्ये २०१८ ची पक्षघटना नमूद केली होती. नंतर ती वकिलांची चूक असल्याचे सांगण्यात आले. ३९ स्वतंत्र उत्तरांमध्ये एकच चूक कशी होऊ शकते, असा सवाल सिब्बल यांनी उपस्थित केला. सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने आधीच घेतलेल्या भूमिकेशी विधानसभा अध्यक्षांचे निष्कर्ष विसंगत असतील, तर अध्यक्ष असा निष्कर्ष कसा काढू शकतात, असाही प्रश्न सिब्बल यांनी उपस्थित केला. दहाव्या अनुसूचीचा उद्देश पक्षांतराला सुरुवातीलाच आळा घालणे हा आहे. सुरत आणि गुवाहाटी येथे आमदारांचा मुक्काम, त्यानंतर भाजपसोबत सरकार स्थापनेचा घटनाक्रम, राज्यपालांकडे पाठविण्यात आलेला विधिमंडळ पक्षाचा ठराव, तसेच विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या निवडीवेळी शिंदे गटातील आमदारांनी केलेले मतदान या घटनांचाही सिब्बल यांनी संदर्भ दिला. सुनील प्रभू यांनी बैठकीला उपस्थित राहण्याचे निर्देश दिल्यानंतर शिंदे गटाने त्यांना असा आदेश देण्याचा अधिकार नसल्याचे सांगितले होते. अधिकृत पक्ष नेतृत्वाला आव्हान देणाऱ्या या कृतींकडेही न्यायालयाने पाहावे, असा ठाकरे गटाचा युक्तिवाद आहे.निवडणूक आयोगाने पक्ष आणि चिन्हाबाबत अधिकार वापरला त्या वेळी नेमकी परिस्थिती काय होती, याचाही तपास आवश्यक असल्याचे सिब्बल यांनी सांगितले. नंतर वाढलेले संख्याबळ वापरून आधीच्या कृतीला वैध ठरवता येणार नाही. अन्यथा सत्तेच्या प्रभावामुळे नंतर मिळालेल्या पाठिंब्याच्या आधारावर पक्षांतराला कायदेशीर संरक्षण मिळेल, असा इशाराही त्यांनी दिला. दरम्यान, शिंदे गटाला धनुष्यबाण चिन्हाचा लाभ मिळाला असला तरी त्यामुळे त्यांच्याकडे न्याय्य हक्क निर्माण होत नाही, असेही सिब्बल यांनी स्पष्ट केले. एखाद्या अवैध कृतीला केवळ कालांतराने वैधता प्राप्त होत नाही, हे स्पष्ट करण्यासाठी त्यांनी सरकारी जमिनीवरील अनधिकृत बांधकामाची उपमा दिली. वर्षानुवर्षे एखादे बांधकाम उभे असले तरी ते अधिकृत ठरत नाही; त्याचप्रमाणे अवैध राजकीय कृतीला नंतरच्या घटनांच्या आधारे वैध ठरवता येणार नाही, असा त्यांचा मुद्दा होता.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४